Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 17 January 2026

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १७ जानेवारी २०२६ सकाळी ११.०० वाजता**

****

राज्यात झालेल्या महानगर पालिका निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला असून महायुतीला अभुतपूर्व यश मिळालं आहे. २९ महापालिकांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या मित्रपक्षांनी २३ जागांवर विजय मिळवला. मुंबई महापालिकेत भाजपने सर्वाधिक ८९ जागा तर शिवसेनेने २९ जागा जिंकल्या. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ६५ जागा तर काँग्रेसने २४ जागा जिंकल्या. राष्ट्रवादी काँग्रेसने ३ तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने फक्त १ जागा जिंकली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला अवघ्या ६ जागांवर यश मिळालं. मराठवाड्यातही महायुतीनं बाजी मारली असून पाचपैकी छत्रपती संभाजीनगर, जालना आणि नांदेड महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप आणि मित्रपक्षांनी दणदणीत यश मिळवलं. तर  काँग्रेस पक्षानं लातूर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं परभणी महानगरपालिका जिंकली.

****

राज्यात झालेल्या महापालिका निवडणुकीत भाजपला अभूतपूर्व यश मिळाल्याचा अत्यंत आनंद वाटत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. राज्यातील जनतेचं आणि भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांचे देवेंद्र फडणवीस यांनी आभार मानले. हा विजय म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरील महाराष्ट्राच्या विश्वासाची पावती असल्याचं ते म्हणाले. हा विजय सर्व कार्यकर्त्यांच्या मेहनतीचा आणि जनतेनं आमच्या विकासाच्या धोरणाला मान्यता दिल्याचा परिणाम असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

****

दरम्यान, राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेनेच्या निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांचं अभिनंदन केलं. यावेळची निवडणूक ही सोपी नव्हती. अचाट धनशक्ती, सत्तेची शक्ती विरुद्ध शिवशक्ती अशी ही लढाई होती, पण या लढाईतही दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उत्तम झुंज दिल्याचं ते म्हणाले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला यावेळेस अपेक्षित यश मिळालं नाही याचं दुःखही त्यांनी व्यक्त केलं. तसंच आपली लढाई मराठी माणसाची, मराठी भाषेची, मराठी अस्मितेच्यासाठीची आणि समृद्ध महाराष्ट्रासाठीची लढाई आहे असं सामाजिक माध्यमावरील आपल्या संदेशात त्यांनी म्हटलं आहे.

****

पुणे महापालिकेच्या १६५ जागांपैकी ११९ जागांवर भाजपने विजय मिळवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एकत्र येऊनही त्यांना ३० जागांवर समाधान मानावं लागलं, तर पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत १२८ जागांपैकी ८५ जागांवर भाजपाला यश मिळालं. या दोन्ही महानगर पालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अपेक्षित यश मिळालं नाही.

****

लातूर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस वंचित बहुजन आघाडीला ७० पैकी ४७ जागांवर विक्रमी विजय मिळवून दिल्याबद्दल माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूरकरांचे काल जाहीर आभार मानले. शांत सुरक्षित आणि सुसंस्कृत लातूर असंस्कृत राजकारण स्विकारत नाहीत हे लातूरच्या जनतेने महानगरपालिका निवडणुकीच्या माध्यमातून दाखवून दिलं असल्याचं त्यांनी म्हटलं.

****

दरम्यान, महापालिकेच्या निकालानंतर काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी या दोन्ही पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी लातूर शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन केलं, त्यानंतर शहरात ठिकठिकाणी जल्लोष साजरा केला.

****

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प येत्या १ फेब्रुवारीला सादर होणार आहे. त्यादिवशी शेअर बाजार सुरू ठेवण्याचा निर्णय मुंबई शेअर बाजार आणि राष्ट्रीय शेअर बाजारानं घेतला आहे. नेहमीच्या वेळेत म्हणजे सकाळी सव्वा नऊ ते दुपारी साडे तीनपर्यंत दोन्ही शेअर बाजारात व्यवहार होतील, असं या बाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

भंडारा जिल्ह्याच्या तुमसर तालुक्यातील मोहगाव इथं जिल्हा परिषद पूर्ण माध्यमिक शाळेत शिक्षकांची संख्या कमी असल्याच्या पार्श्वभूमीवर, जो पर्यंत शिक्षक दिला जात नाही तो पर्यंत विद्यार्थी शाळेत पाठवणार नाही, अशी भुमिका पालकांनी घेतली आहे. या शाळेत ८२ पटसंख्या असून ३ शिक्षक कार्यरत आहेत. पालकांनी वारंवार शिक्षण विभागाला निवेदन दिल्यानंतरही अजून पर्यंत एकही अतिरिक्त शिक्षक या शाळेवर नेमण्यात आला नाही, त्यामुळे पालकांनी ही भूमिका घेतली आहे.

****

क्रिकेट -एकोनावीस वर्षाखालील एकदिवसीय सामन्यांच्या विश्वचषक स्पर्धेत आज दुपारी झिम्बाब्वेतील बुलावायो इथं भारताचा ग्रुप अ मधील दुसरा सामना बांगलादेशशी होईल. हा सामना भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी एक वाजता सुरू होईल. पावसामुळं प्रभावित झालेल्या पहिल्या सामन्यात भारतानं डकवर्थ-लुईस नियमानुसार अमेरिकेचा सहा गडी राखून पराभव करत गुणांचं खातं उघडलेलं आहे.

****